# जिल्हा परिषद, गडचिरोली
## सामान्य प्रशासन विभाग
दुरध्वनी क्रमांक (07132)297463 email :- zpgadmail@gmail.com


क्रमांक/जिपग/साप्रवि/स्था-7/पेन्शन शाखा/ 1981 /2026, दिनांक:- 01/10/2026

**अधिकारी, कर्मचारी व निवृत्ती वेतन धारक अदालत**
**दिनांक 07 ऑक्टोंबर 2026 रोजी आयोजित करणेबाबत.**

---

**संदर्भ** :- 1) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. गडचिरोली यांचे परिपत्रक क्रमांक / सा.प्र.वि./ आस्था -2 (अ) /597/2026 दिनांक 06.07.2026

2) या कार्यालयाचे पत्र क्र. क्रमांक/जिपग/साप्रवि/स्था-7/पेन्शन शाखा/1018/2026 दि. 28.07.2026

3) या कार्यालयाचे पत्र क्र. क्रमांक/जिपग/साप्रवि/स्था-7/पेन्शन शाखा/1928/2026 दि. 25.09.2026

## परिपत्रक

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते कि, अधिकारी, कर्मचारी व निवृत्ती वेतन धारक यांच्या सेवा विषयक अडचणी, तक्रारी, प्रलंबित प्रकरणे तसेच विविध प्रशासकिय बाबीवर सुनावणी करुन त्यांचे तात्काळ निराकरण करण्याचे उद्देशाने अधिकारी, कर्मचारी व निवृत्ती वेतन धारक अदालत दिनांक 21.07.2026 रोजी राष्ट्रीय शहीद विर बाबुराव शेडमाके सभागृह, जिल्हा परिषद, गडचिरोली येथे आयोजित करण्यात आली होती.

संदर्भिय पत्र क्रमांक 2 व 3 नुसार प्राप्त निवेदनाचे अनुषंगाने Google Drive मध्ये Excell Sheet देण्यात येऊन सदर Excell Sheet अद्यावत करणे, प्राप्त निवेदनाचे निराकरण करण्याची दक्षता घेणे व अहवाल या कार्यालयास सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. सदर प्राप्त तक्रारीचा आढावा घेण्याचे उद्देशाने **दिनांक 07.10.2026 रोजी बुधवारला सकाळी 11.00 वाजता** राष्ट्रीय शहीद विर बाबुराव शेडमाके सभागृह, जिल्हा परिषद, गडचिरोली येथे आयोजित करण्यात सभा घेण्यात येत आहे. तरी सदर अधिकारी , कर्मचारी व निवृत्ती वेतन धारक अदालतीमध्ये तालुकास्तरावरील सेवा विषयक प्रकरणांचा प्रभावीपणे आढावा घेता यावा व आवश्यक कागदपत्रांसह तात्काळ कार्यवाही करता यावी यासाठी सर्व सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी तसेच आस्थापना शाखेचे कामकाज सांभळणारे कार्यासन कर्मचारी यानी निश्चित वेळेत उपस्थित राहणे आवश्यक राहील.

तसेच ज्या अधिकारी , कर्मचारी व निवृत्ती वेतन धारक यांना त्यांच्या सेवा विषयक तक्रारी , निवेदने, प्रलंबित प्रकरणे, वेतन , निवृत्ती वेतन आश्वासित प्रगती योजना, रजा,सेवापुस्तकात, पदोन्नती ,वेतन निश्चिती अथवा इतर प्रशासकिय बाबी अदालतीसमोर मांडावयाच्या आहेत. त्यांनी संबंधित प्रकरणासंदर्भातील आवश्यक कागदपत्रे, प्रस्ताव, आदेश,सेवा अभिलेख इत्यादींसह उपस्थित रहावे.

Scanned with OKEN Scanner

सर्व संबंधित सदर सुचनेची नोंद घेऊन आवश्यक कार्यवाही करावी तसेच अधिनस्त अधिकारी , कर्मचारी व निवृत्ती वेतन धारक यांना अदालतीस उपस्थित राहण्याबाबत अवगत करावे.

**( मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे टिपणीवरील निर्देश)**

01/10

(अनिकेत पाटील)
मा.उपमुख्य कार्यकारीअधिकारी(सा.)
जिल्हा परिषद, गडचिरोली

प्रतिलीपी :-

1) अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांना माहीतीस अग्रेषित.
2) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा जिल्हा परिषद, गडचिरोली यांना माहीतीस अग्रेषित.
3) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (सा.प्र./ ग्रा.पं.) जिल्हा परिषद, गडचिरोली यांना माहीतीस अग्रेषित.
4) मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी जिल्हा परिषद, गडचिरोली यांना माहीतीस अग्रेषित.
5) कार्यकारी अभियंता (बांध) जिल्हा परिषद, गडचिरोली यांना माहीतीस तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित सदर दिनांकास विर बाबुराव शेडमाके सभागृह उपलब्ध ठेवण्यात यावे आसन व्यवस्था ध्वनी व्यवस्था सुविधा उपलबध् करुन देणेबाबत दक्षता घेण्यात यावी.
6) खाते प्रमुख (सर्व) ---------------------------------------------------------------- जिल्हा परिषद, गडचिरोली यांना माहीतीस अग्रेषित आपण आपल्या अधिनस्त सर्व कार्यलयांना सदरचे परिपत्रकावरुन सुचित करावे.
7) गट विकास अधिकारी (सर्व) --------------------------------------------------------------------------------- यांना माहीतीस अग्रेषित आपण आपल्या अधिनस्त सर्व कार्यलयांना सदरचे परिपत्रकावरुन सुचित करावे.

(अनिकेत पाटील)
मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सा.)
जिल्हा परिषद, गडचिरोली

Scanned with OKEN Scanner